# महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर समन्वय वादी भूमिका चिकित्सक अभ्यास

**प्रा. मनिषा श्रेणिककुमार पाटील.** इतिहास विभाग क.भा. पा. कॉलेज उरूण इस्लामपूर मोबाईल नं -८६६९०१२६८१

---

स्वातंत्र्य ही गांधींजींची तर समता ही आंबेडकरांची पहीली मागणी होती. महात्मा गांधींना ब्रिटिश सत्ता भारतातून गेली पाहीजे असे वाटत होते. तर डॉ.आंबेडकरांना वाटत होते की ब्रिटिशांची परकीय सत्ता फक्त देशातून जावून चालणार नाही. तर त्यांची सत्ता गेली तरी सवर्णाची सत्ता तशीच राहील. दलितांच्या पदरी असणारे नष्टचर्य तसेच रहील. त्यांच्या मते "राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक समतेच्या लढयाला प्राधान्् दया. अधिक विचारपूर्वक पाहीले असता दोघांच्याही भूमिका परस्पर विरोधी असल्याचे दिसून येते.

"गांधीजींवर टीका करुन आम्ही त्यांच्यावर अन्यायच केला आहे. त्यांचा विचार अधिक विधायकरीत्या समजून घेतला असता तर आजचे अनेक सामाजिक तिढे सुटले असते" असे मत एका जेष्ठ दलित अभ्यासकाने मांडले आहे. गांधी व आंबेडकर यांचे दोघांचेही ध्येय स्वराज्य होते. परंतु दोंघांच्याही स्वराज्याचा उद्देश मात्र भिन्् असल्याचे दिसुन येते. १९३० नंतर दोघांचा वाद संवाद सतत सुरु च होता. बाबासाहेब म. गांधीपेंक्षा २२ वर्षांनी लहान होते. मिठाच्या सत्याग्रहानंतर ब्रिटीशानाही गांधीचे मत लक्षात घेणे क्रमप्राप्् झाले. भारताचा घटनात्मक आराखडा तयार करण्यासाठी ब्रिटिश सरकारने लंडनला गोलमेज परिषदेचे आयोजन केले. परिषदेपूर्वी म. गांधी व डॉ.आंबेडकर यांची भेट झाली. काँग्रेस मातृभूमीसाठी संघर्ष करीत असताना आंबेडकर काँग्रेसवर एवढी टीका का करतात असा प्रश्न विचारला असता आंबेडकर म्हणाले " गांधीजी मला मातृभूमी नाही. कोणत्याही अस्पृश्याला या भूमीबद्दल आदर वाटणार नाही"[१] यावेळी बाबासाहेब अस्पृशांच्या सामाजिक विषमतेबद्दल विषण्णमत व्यक्् करताना दिसतात. वर्षानुवर्ष अस्पृश्यांच्या वर होणाऱ्या अन्यायामुळे डॉ. आंबेडकरांचे मन जातीभेद – वर्णभेद याबद्दल निराशावादी झालेले दिसते. ज्याभूमीत माणूस म्हणून जगताच आले नाही किंवा जगुच दिले नाही. ती भूमी आमची कशी म्हणावी? असा विचार ते करत असताना दिसतात.

## गोलमेज परीषद –

महात्मा गांधी व आर्यविन यांच्यात करार झाल्यानंतर ते दुसऱ्या गोलमेज परीषदेला उपस्थित रहाणार होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून परीषदेस उपस्थित राहीले. दुसऱ्या गोलमेज परीषदेत गांधी व आंबेडकर समोरासमोर आले. अस्पृश्यांना हिंदू समाजापासून वेगळी अल्पसंख्् गट म्हणून मान्यता मिळावी अशी डॉ आंबेडकरांची भूमिका होती.तर अस्पृश्् हे हिंदू समाजाचे अविभाज्् भाग आहेत अशी गांधीजी धारणा होती. या भिन्् विचार सरणीमुळे गांधी आंबेडकर यांच्यात मतभेद झाले.[२]

गांधीजी अस्पृश्् समाज हा भारतीय समाजाचाच भाग मानत होते. "फोडा व राज्् करा" ही ब्रिटिशांची नीती ते जाणतच होते. सुवर्ण – अस्पृश््, व विविध जातीना कधी अल्पसंख्् तर कधी अलगाव वादी वृत्ती मुळे भारतीय समाज एससंध कधीच होणार नाही. आणि स्वातंत्र्य ही मिळणार नाही. असे म. गांधीना वाटत होते. तरीही समानतेचे तत्् महत्त्वाचे सामाजिक समताही आवश्यक असे बाबासाहेबांना वाटत होते.

## गांधीजीचे उपोषण आणि बाबासाहेब –

बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांच्या मनातील अस्पृश्् ही प्रतिमा काढून टाकण्यासाठी "दलित" हा शब्द प्रचारात आणला.[३]

गोलमेज परिषदेतही गांधीजीबरोबर त्यांचा वैचारीक वाद झाला. गांधीजींच्या मते, 'जातीव्यवस्थेचे व्यावहारीक उपयोग आहेत. त्यामुळे समाजातील कामे सुरळीत होतात. परंतु "अस्पृश्यता" ही समाजशरीरावरील अनावश्यक चामखिळीसारखी आहे.' ते गांधीजींना लोकशाहीवादी सुधारकांचे सोंग आणणारे कर्मठ जातीयवादी समजत असत. आंबेडकरांसोबत झालेल्या वादामुळे १९३२ मध्ये म. गांधींनी प्राणांतिक उपोषण केले होते. 'अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ हवा'. या मागणीला विरोध करण्यामागचा संघर्ष हा तत्वांचाच होता.

"भारतीयांनी एकजूट करुन प्रथम स्वातंत्र्य मिळविणे गरजेचे'' असे गांधीजींना वाटत असे. तर "अगोदर त्यांनी आपल्या लोकांना न्याय दयावा. आणि नंतर तो ब्रिटिशांकडून मागावा''. असे डॉ. आंबेडकरांना वाटे. प्राणांतिक उपोषणापूर्वी एक वर्ष अगोदर गांधीजी म्हणाले होते, "अस्पृश्यांच्या एवढया मोठया संख्येचे प्रतिनिधीत्् मी स्वत: करु शकतो. असा माझा दावा आहे" हा त्यांचा दृष्टीकोण हेकटच होता. गांधींच्या उपोषणामुळे दडपणामुळे डॉ. आंबेडकर तडजोडीस तयार झाले बॅ. मु.रा. जयकर, तेजबहाद्दर सप्रु पं. मदनमोहन मालवीय यांच्या मध्यस्तीस यश येवून 'पुणे करार' झाला त्यानुसार प्रांतिक विधीमंडळाच्या एकूण ७८०पैकी १४८ व वरीष्ठ कायदेमंडाळाच्या १८ टक्के जागा अस्पृश्यांना मिळाल्या. पुढील काळात महीन्याभरातच पुणे कराराने निर्माण केलेले सामंजस्् 'हरिजन सेवक संघाच्या' एखाद्या कारभारामुळे नष्ट झाले. बंगालचे सवर्ण हिंदूमहासभा अ.भा. काँग्रेस कमिटी यांनी जातीय निवाडयास स्पष्ट विरोध केला.[४]

त्यामुळे आंबेडकर गांधींच्या तीव्रपणे विरोधात गेले. अस्पृश्यांना आपला लढा आपणच दयायला पाहीजे. अशी त्यांची खात्रीच पटली.

**पुणे करार – गांधीजी व बाबासाहेब -**

पुणे कराराबाबत आपण असे म्हणू शकतो की, एका निशस्त्र माणसाच्या त्यागापुढे ब्रिटीश साम्राज्य् सत्तेने माघार घेतली. मुस्लीम लीगला हा आपला पराभव वाटला. मुस्लिम लीगला वाटत होते की बाबासाहेब आपल्या समुहासहित मुस्लिम धर्म स्विकारतील. [५]

बाबासाहेबांच्या मागणीनुसार त्यांना राखीव जागा मिळाल्या होत्या. मुस्लिम लीग ची निराशा झाली" गांधीशी बरोबरीच्या नात्याने वाटाघाटी करणारा नेता म्हणून बाबासाहेबांना इतर नेत्यांच्या तुलनेत वरचे स्थान प्राप्त झाले. आणि आंबेडकरांची समाज व सरकार यांना नमविण्याची ताकदही सर्वांच्या ध्यानात आली.

**राष्ट्रीय काँग्रेस व डॉ. आंबेडकर**

बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रीय काँग्रेसचा विरोध केला हे तात्विक होते त्याकाळात काँग्रेसला विरोध म्हणजे राष्ट्रीय चळवळीलाच विरोध असे समीकरण होते.

"गांधीजीचे अर्थशास्त्र आणि राजकीय विचार देशाला पुढे नेणारे नसून गांधीजी इतिहासाची चाके भूतकाळाकडे उलटी फिरवीत आहेत" हे आंबेडकरांचे गांधीवरील टीकेचे प्रमुख सूत्र होते.[६] त्याना काँग्रेस क्रांतीकारी संस्था वाटत नव्हती. १९३८ मध्ये जनता' या आंबेडकरांच्या नियतकालीकात आंबेडकर म्हणतात," काँग्रेसने खरोखरच ब्रिटिश साम्राज्यशाही विरोधी लढा पुकारला असता तर मी त्या पक्षाला मिळालो असतो. परंतु त्यानी शेतकरी व कामगार यांच्या हिताचा बळी दिला आहे. [७] कॉग्रेस समाजवाद्याना कांग्रेस समाजवादी संघटना वाटत होती. बाबासाहेब स्वतःला समाजवादी म्हणवून घेत होते. परंतू त्यांची समाजवादयांशी दोस्ती झाली नाही. राजकारण हे वर्गीय जाणीवेवर उभे असले पाहीजे. वर्गीय जाणीवे शिवाय असणारे राजकारण ही शुद्ध भोंदुगिरी आहे. असे बाबासाहेबांचे मत होते.

**डॉ. आंबेडकरांबाबत गांधीजींची स्नेहभावना-**

१९३१ च्या ऑक्टोबर मध्ये ऑक्सफर्डमधील एका बैठकीत गांधीजी म्हणाले होते." मला आंबेडकरांबद्दल अतिशय आदर आहे. त्यांना कटू होण्याचा पूर्ण अधिकार आहे. ते आमचे डोके फोडत नाहीत. हे त्यांचे आत्म नियंत्रण आहे. "[८] १९३३ मध्ये गांधीजीनी एका मित्रास लिहिलेल्या पत्रात म्हटले की आंबेडकर कॉग्रेसवर चिडून आहेत. त्यात अनैसर्गिक काहीही नाही. हिंदूधर्ममार्तडांनी अस्पृश्याना दिलेली अमानवी वागणुक त्यानी पाहिली आहे. त्यांनी अनेक मानसन्मान मिळविले परंतु भारतात मात्र त्यांना अस्पृश्याना मिळणाऱ्या अपमानास्पद वागणूकीस तोंड द्यावे लागते'' बाबासाहेबांचे गांधीना कौतुक ही वाटते ते म्हणतात "आंबेडकरांनी मोठा त्याग केला आहे. ते अत्यंत साधेपणाने जगतात. स्वतःच्या कामात व्यस्त असतात, त्यांची इच्छा असती तर युरोपात जावून स्थायिक होवू शकले असते. परंतु त्यांना तिथे रहायचे नाही. त्यांना केवळ हरीजन कल्याणाची चिंता आहे.[९] (जुन १९३४ कराची - विद्यार्थ्यासमोरील भाषण. ) - बाबासाहेब हिंदू धर्माचा त्याग करणार अशी घोषणा १३ ऑक्टोबर १९३५ मध्ये करतात, ते म्हणतात, " मी हिंदू म्हणून मरणार नाही." अस्पृश्याना राजकीयदृष्ट्या संघटीत करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करतात (ऑगस्ट १९३६) मुंबईच्या प्रांतिक कायदेमंडळात विरोधी पक्ष म्हणून काम करण्यास सुरुवात करतात त्याच वेळी डॉ आंबेडकरांचा गांधीविरोध वाढू लागला. गांधीच्या हरीजन शब्दावरही ते आक्षेप घेवू लागले. मुंबई प्रांतिक कायदे मंडळात जेंव्हा कांग्रेसने एक विधेयक मांडताना हरिजन शब्द वापरला तेंव्हा आंबेडकरानी सभात्याग केला. गांधी- व आंबेडकरांमध्ये दुरावा निर्माण झाला तरी त्यांच्यातील वाद-संवाद मात्र खंडीत झाला नाही.

**बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन व गांधीजी:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'जातीसंस्थेचे निर्मुलन' या निबंधावर सनातन्यानी टीकेची झोड उठविली होती. परंतु कोणालाही प्रतिसाद न देता आंबेडकर गांधीना प्रतिसाद देतात आंबेडकरांच्या मते. " वर्ण जातिव्यवस्थेवर आधारीत समाजरचना चूक आहे. गांधी चातुवर्ण्याच्या पुरस्कार करतात. प्रत्येकाने जन्माने नव्हे तर स्वेच्छेने कोणतेही काम करावे. जातिव्यवस्था व हिंदू धर्माचा कोणताही संबंध नाही'' बाबासाहेब पुढे असेही म्हणतात, " एक काळ असा होता, की, महात्मा गांधी पूर्णतः सनातनी हिंदू होते. त्यांचा वेद, उपनिषदे, पुराणे इ. हिंदू ग्रंथावर विश्वास होता. अवतार – पुनर्जन्मावरही विश्वास होता. जातिव्यवस्थेचेही त्यानी जोरदार समर्थन केले आहे. परंतु अतिशय चांगले आहे की, त्यानी आता या सर्व गोष्टी नाकारायला सुरुवात केली आहे. जातिव्यवस्था आत्मिक आणि राष्ट्रविकासास बाधक आहे ही गोष्ट त्यानी स्विकारली आहे. "[१०] आंबेडकर गांधीजींच्या विचारातील बदल ही दाखवून देतात.

बाबासाहेब आंबेडकरना अस्पृश्याना मिळणारी दुय्यम व हीन वागणूक याबद्दल तीव्र संताप होता. म्हणून त्यांनी कॉग्रेस व गांधीजी यांना विरोधच केला असे म्हणता येत नाही. त्यानी भारताच्या स्वातंत्र्यास ही विरोध केला नाही. त्याना ब्रिटिश धार्जिणे म्हणणेही चुकीचेच आहे. आंबेडकरानी १९४० मध्येच नागपूर परिषदेत स्वराज्याच्या मागणीला पाठींबा दिला होता. ते म्हणतात,

"स्वराज्य आम्हालाही हवे आहे. पण या स्वराज्यातून पुन्हा पेशवाईया उगम होणार नाही. अशी आमची खात्री पटविण्यासाठी घटनेत काही तरतूद करा."[११] यामुळे बाबासाहेबाना स्वातंत्र्य विरोधी संबोधता येत नाही. बाबासाहेब चातुवर्ण्याच्या जातीसंस्थेच्या तिच्या चौकटीच्या विरोधात होते. गांधीच्यासोबत त्यांचे वैचारिक वाद होते. परंतु बाबा साहेबांच्या कार्याचे, बुद्धीचे, संघर्षाचे महात्मा गांधीनी कौतुकच केल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष**

१) राजकीय स्वातंत्र्याच्या लढयापासून बाबासाहेबानी सतत एक अंतर राखल्याचे दिसते. याचा अर्थ राजकीय स्वातंत्र्य लांबणीवर पडावे अशी त्यांची इच्छा होती असा होत नाही. स्वातंत्र्याबरोबरच वर्ग, वर्ण, जात विषयक समता अभिप्रेत होती.

२) १९३३ नंतर बाबासाहेबानी कॉंग्रेस व गांधी यांवर टीका सुरू केल्यावर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी त्याना आणखी जवळ केले. पूर्वास्पृशाना न्याय देण्याची भूमिका बाबासाहेब आंबेडकरांच्या रेट्यामुळे काँग्रेसने घेतली नव्हती ते काँग्रेसचे ध्येयधोरण होते. महात्मा गांधीमुळे बाबासाहेबांचा समावेश पहिल्या राष्ट्रीय मंत्री मंडळात झाला. हे लक्षात घेतले पाहीजे.

३) ब्रिटीश व मुस्लिम लीग ने बाबासाहेबांचा सम्मान केला नाही तर तो गांधीजी व कॉंग्रेस यानी केला. राज्यघटनेने अस्पृश्यांना जो न्याय मिळाला त्यामध्ये बाबासाहेब व काँग्रेस यांची परस्पराना साथ होती.

४) गांधीजींवर टीका करणारे बाबासाहेब व त्यांची प्रसंशा करणारे गांधीजी हे दोघेही वैचारीक सन्मानास महत्व देणारे होते. याची दखल घ्यावी लागते.

५) अस्पृश्यता हा धर्मावरील कलंक आहे. 'हे गांधीनी सतत जाहीर केले आणी तिचे उच्चाटन व्हावे म्हणून गांधीजी व बाबासाहेब यांनी सातत्याने प्रयत्न केले.

**संदर्भ**

1. समाज प्रबोधन पत्रिका- वर्ष - ५४, क्र. २१६, ऑक्टोबर, डिसेंबर- २०१६ - पृष्ठ क्र-१०३.
2. कित्ता पृष्ठ क्र-१०४.
3. यांनी घडविला इतिहास- सुनिल खिलनानी - अनुवाद-सविता दामले - ISBN - 978-93-89143-20-1 - मंजुल पब्लिशिंग हाऊस - पुणे पृष्ठ क्र. ३४९
4. मराठी विश्वकोश- प्रथमावृत्ती पुणे करार - https://vishwakosh.marathi.gov.in
5. गांधीजी आणि त्यांचे टीकाकार- सुरेश द्वादशीवार- साधना प्रकाशन- पुणे ISBN 978-93-86273-26-0-पाचवी आवृत्ती- १५ जुलै २०१९ पृष्ठ क्र. १२७.
6. आंबेडकरवाद : तत्व आणि व्यवहार- डॉ. रावसाहेब कसबे - सुगावा प्रकाशन - सदाशिव पेठ पुणे - प्रथमावृत्ती - ऑक्टोबर १९८९ - पृ.क्र.४७.
7. जनता - दि. ३१ डिसे. १९३८ .
8. समाज प्रबोधन पत्रिका - पृष्ठ क्र. १०६.
9. कित्ता - पृष्ठ – १०७.
10. डॉ बाबासाहेब आंबेडकर खंड १- १९७९ - पृष्ठ क्र. ९२.
11. डॉ. आंबेडकर, रा. स्व. संघ. आणि सरकार- शंकरराव मोरे (खासदार)- विशाल सह्याद्री ट्रस्ट निर्मिती - पुणे - ३०- प्रथमावृत्ती १४ ऑगस्ट १९९९ साप्ताहिक जनसत्ता लेखांक - जुलै ते ऑक्टोबर १९४९ प्रस्तावना.